FILE SCANNED

**मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान यांच्या spouse यांना खाजगी दौऱ्याच्या वेळेस राज्य अतिथी घोषित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.एसजीआर-१००७/प्र.क्र.८५/३१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ मार्च, २००८.

वाचा : शासन निर्णय क्र.एसजीआर-१००२/६८८/प्र.क्र.९२/३१, दि.१.१.२००४

**प्रस्तावना :**

राज्य अतिथी नियमानुसार मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती व मा.पंतप्रधान यांचे पती, पत्नी हे यांच्या स्वतंत्रपणे भेटीच्या वेळेस राज्य अतिथी नाहीत. तथापि, त्यांच्या भेटीच्या वेळी आवश्यक ते आदेश प्राप्त करुन त्यांना राजशिष्टाचार विषयक सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान हे घटनात्मक दृष्ट्या देशाचे सर्वोच्च पद असल्याने त्यांच्या पदाचा मान व आदर तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांच्या पती/पत्नी यांना त्यांच्या या राज्याच्या स्वतंत्र भेटीच्या वेळेस त्यांना राज्य अतिथी घोषित करणे, तसेच, आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांना कायमस्वरुपी राज्य अतिथी घोषित करण्याचे शासनाच्या विचाराधिन होते. त्यासंदर्भात शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

अ) **मा.राष्ट्रपती यांचे पती/पत्नी हे ज्या ज्या वेळेस महाराष्ट्र राज्यास स्वतंत्ररित्या भेटी देतील त्या त्या वेळेस त्यांना ५ दिवसाकरिता राज्य अतिथी समजण्यात येईल. सदर कालावधीत त्यांना खालीलप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

१) परिवहन व्यवस्थेकरिता

अ) पायलट कार
ब) व्हीव्हीआयपी कार
क) एस्कॉर्ट कार

२) स्वागत व निरोपाकरिता राजशिष्टाचार अधिकाऱ्याची नियुक्ती करणे तसेच, स्थानिक दौऱ्याच्या वेळेस त्यांच्यासह एका राजशिष्टाचार अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

३) स्पाऊस व एडीसीची निवास व्यवस्था मुंबई भेटीच्या वेळेस सह्याद्री राज्य अतिथीगृहात व राज्याच्या इतर ठिकाणी सर्कीट हाऊसमध्ये एडीसीच्या निवास व्यवस्थेसह करण्यात यावी.

स्पाऊस यांच्यासह येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची राज्य अतिथीगृहात, सर्कीट हाऊस, शासकीय विश्रामगृहात निवास व भोजन व्यवस्था करण्यात यावी.

४) <u>दूरध्वनी व्यवस्था</u> :

निवासाच्या ठिकाणी STD तसेच ISD दूरध्वनी लाईन उपलब्ध करुन देणे.

५) <u>सुरक्षा व्यवस्था</u> :

सुरक्षा व्यवस्था ब्लू बुकमध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) <u>रेल्वेने प्रवास</u> :

राष्ट्रपतींचे स्पाऊस रेल्वेने प्रवास करीत असल्यास त्यांच्यासह उप पोलीस निरीक्षक किंवा सहायक पोलीस निरीक्षक यांच्यासह ४ पोलीस कॉन्स्टेबल्स त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेकरिता पुरविण्यात यावेत. सदर सुरक्षा दल राष्ट्रपतींच्या स्पाऊस प्रवास करीत असलेल्या लगतच्या डब्यामध्ये प्रवास करतील.

ब) <u>मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान</u> यांचे पती/पत्नी हे ज्या ज्या वेळेस महाराष्ट्र राज्यास स्वतंत्ररित्या भेटी देतील त्या त्या वेळेस त्यांना ५ दिवसाकरिता राज्य अतिथी समजण्यात येईल. सदर कालावधीत उपरोक्त मान्यवरांना खालीलप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

१) परिवहन व्यवस्था :

अ) एस्कॉर्ट कार

ब) व्हीव्हीआयपी कार

क) पायलट कार (पायलट वाहन देण्याबाबत त्या त्या घटकांचे पोलीस प्रमुख स्थानिक परिस्थिती पाहून आवश्यकता भासल्यास पायलट वाहन पुरवतील.)

२) <u>निवास व्यवस्था</u> :

स्पाऊसची निवास व्यवस्था मुंबई भेटीच्या वेळेस सह्याद्री राज्य अतिथीगृहात करण्यात यावी. त्याचप्रमाणे त्यांच्यासह येणाऱ्या एडीसीची निवास व्यवस्थासुध्दा सह्याद्री राज्य अतिथीगृहात करण्यात यावी. राज्याच्या इतर ठिकाणी सर्कीट हाऊसमध्ये निवासव्यवस्था करण्यात यावी. त्याचप्रमाणे एडीसीचीसुध्दा निवास व्यवस्था सर्कीट हाऊसमध्ये करण्यात यावी.

स्पाऊस यांच्यासह येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची राज्य अतिथीगृहात, सर्कीट हाऊस, शासकीय विश्रामगृहात निवास व भोजन व्यवस्था करण्यात यावी.

३) **सुरक्षा व्यवस्था :**

सुरक्षा व्यवस्था ब्लू बुकमध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा.को. बोरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) भारताचे राष्ट्रपती यांचे सचिव, नवी दिल्ली,
२) भारताचे उपराष्ट्रपती यांचे सचिव, नवी दिल्ली,
३) भारताचे पंतप्रधान यांचे सचिव, नवी दिल्ली,
४) अध्यक्ष, उपाध्यक्ष, लोकसभा यांचे खाजगी सचिव, नवी दिल्ली,
५) सभापती/उपसभापती राज्यसभा यांचे खाजगी सचिव, नवी दिल्ली,
६) प्रबंधक, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली,
७) सर्व उच्च न्यायालयाचे प्रबंधक,
८) मंत्रीमंडळ सचिव, भारत शासन, नवी दिल्ली,
९) भारत शासनाचे सर्व सचिव,
१०) सर्व राज्य शासनाचे/केंद्र शासित प्रदेशाचे मुख्य सचिव,
११) महालेखापाल, भारत सरकार, नवी दिल्ली,
१२) अध्यक्ष, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
१३) निवडणूक आयुक्त, भारत सरकार, नवी दिल्ली,
१४) अध्यक्ष, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, नवी दिल्ली,
१५) अध्यक्ष, संसदीय समिती, लोकसभा/राज्यसभा,
१६) सर्व राज्य शासनाचे/केंद्रशासित प्रदेशाचे राज्यपालांचे सचिव,
१७) सर्व राज्य शासनाचे/केंद्रशासित प्रदेशाचे मुख्यमंत्र्याचे सचिव,
१८) सर्व राज्य शासनाचे/केंद्रशासित प्रदेशाचे पोलीस महासंचालक,
१९) महाराष्ट्र राज्याचे राज्यपालांचे सचिव, राजभवन, मंत्रालय, मुंबई,
२०) महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२१) महाराष्ट्र शासनाचे सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२२) महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
२३) महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई,
२४) प्रधान सचिव व विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
२५) महाराष्ट्र शासनाचे सर्व विभागीय आयुक्त,
२६) महाराष्ट्र शासनाचे पोलीस महासंचालक,
२७) महाराष्ट्र शासनाचे सर्व पोलीस आयुक्त,
२८) पोलीस आयुक्त (लोहमार्ग), मुंबई
२९) पोलीस अधिक्षक (लोहमार्ग), पुणे, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर
३०) सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिक्षक व पोलीस अधिक्षक,
३१) व्यवस्थापक, सहयाद्री, नंदगिरी राज्य अतिथीगृह,